# कार्यालय
# नगर परिषद वाडी
ता. व जि. नागपूर

---

क्रमांक/नपवा/पापु व स्व वि/कावि-479/२०२६ दि. १८/०५/२०२६

प्रति,

मा. व्यवस्थापक

, नागपूर

**विषय-** वाडी नगर परिषदेची निविदा सूचना प्रकाशित करणेबाबत.

नगर परिषद वाडी कार्यालयातून कळविण्यात येते कि, खालीलप्रमाणे निविदा सूचना आपले दैनिक वर्तमानपत्राचे एका अंकात कमीत कमी जागेमध्ये अविलंब प्रकाशित करण्याची व्यवस्था करावी व प्रकाशित झालेल्या दैनिक वृत्तपत्राच्या ५ प्रति या कार्यालयास पाठवाव्यात. तसेच शासकीय दराने बिल मुख्याधिकारी नगर परिषद वाडी
या नावाने कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी. ही विनंती.

सह्पत्र – निविदा सूचना

मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी

# कार्यालय
# नगर परिषद वाडी
ता. व जि. नागपूर

जा.क्र .नपमो /पापु व स्व वि/ ८७९ /२०२६ दि .१८/०५/२०२६

**निविदा सूचना २०२६-२७**

मुख्याधिकारी, नगर परिषद वाडी, जि- नागपूर यांच्या वतीने पाणी टंचाई अंतर्गत नगर परिषद वाडी सन २०२६-२७ नगर परिषद वाडी पाणी टंचाई अंतर्गत प्रभाग क्र.११ नवनीत नगर म्हाडा कॉलोनी व अमिता सोसायटी , प्रभाग क्र.१० अंतर्गत रघुपती नगर येथे रमेश कांबळे यांचे घराजवळ व रामप्रताप विश्वकर्मा यांचे घराजवळ विंधन विहीर करून त्यावर हातपंप बसविणे, विद्युतपंप बसविणे चे काम करणे तसेच प्रभाग क्र.१ येथील सार्वजनिक विहिरी दुरुस्तीचे काम करून विहिरीवर लोखंडी जाळी बसविणे व रघुपती नगर येथील बिडवाईक च्या विहिरीवर लोखंडी जाळी लावण्याचे काम करणे च्या कामासाठी योग्य त्या वर्गात नोंदणीकृत, अनुभवी व इच्छुक निविदाधारक/ पुरवठादार यांचेकडून ऑनलाईन पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| निविदा पत्रकाची किंमत | अनामत रक्कम | निविदा सादर करण्याचा कालावधी | निविदा उघडण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| रु. १०००/- | रु.११८७/- | दिनांक १९/०५/२०२६ ते २५/०५/२०२६ (कार्यालयीन वेळेत) | दिनांक २६/०५/२०२६ दु.१२.०० वाजता |

निविदेच्या सविस्तर अटी व शर्ती काही शंका असल्यास कार्यालय नगर परिषद वाडी येथे संपर्क साधावा..

(डॉ. ऋचा धाबर्डे)
18/5/2026
मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी

परिषद वाडी * ता. जि. नागपूर *

# निविदा

मी/आम्ही याद्वारे खाली दिलेल्या ज्ञापनात नमुद कलेले काम या सोबत जोडलेल्या अनुभवी ''ब'' मध्ये नोंद केलेल्या दरानी मुख्याधिकारी, नगर परिषद वाडी यांना निविदा सादर करित आहे/आहोत.

अ – सर्वसाधारण वर्णन – **नगर परिषद वाडी पाणी टंचाई अंतर्गत प्रभाग क्र.११ नवनीत नगर म्हाडा कॉलोनी व अमिता सोसायटी , प्रभाग क्र.१० अंतर्गत रघुपती नगर येथे रमेश कांबळे यांचे घराजवळ व रामप्रताप विश्वकर्मा यांचे घराजवळ विंधन विहीर करून त्यावर हातपंप बसविणे, विद्युतपंप बसविणे चे काम करणे तसेच प्रभाग क्र.१ येथील सार्वजनिक विहिरी दुरुस्तीचे काम करून विहिरीवर लोखंडी जाळी बसविणे व रघुपती नगर येथील बिडवाईक च्या विहिरीवर लोखंडी जाळी लावण्याचे काम करणे**

| | |
|---|---|
| ब – अंदाजीत खर्च रुपये | रु. 1187546/- |
| क – इसाऱ्याची (अनामत) रक्कम रुपये | रु. 1187/- |
| ड – सुरक्षीत ठेव | – ०५ टक्के चालु बिलातून |
| इ – बांधकाम/पुरवठा सुरु करण्यासाठी दिलेल्या लेखी आदेशाच्या दिनांकापासून बांधकामासाठी मंजूर केलेला कालावधी – | **३० दिवस** |

ही निविदा स्विकारण्यांत आल्यास मी/आम्ही यासोबत जोडलेल्या सर्व अटी आणि शर्तीच्या तरतुदीचे पालन करण्यांचे आणि त्या जितपत लागू होत शकतील तितपत पुर्ण करण्यांचे कबूल करित आहे/आहोत. आणि तसे करण्यांत कसूर झाल्यांस उक्त शर्तीमध्ये नमूद केलेली रक्कम समपध्दत (फॉरपीट) होईल व ती रक्कम मी/आम्ही नगर परिषदेला देईल असेही कबूल करित आहे/आहोत.

पत्ता ............................................

............................................

............................................

कंत्राटदाराची सही.

दिनांक ..................

**नविदेच्या शर्ती**

१. सदर काम पाणी टंचाई अंतर्गत प्राप्त निधी /पाणी पुरवठा निधी/१५ वा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त निधीतून घेण्यात आले असल्याने निधी च्या उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल.

२ निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दराचा असेल तर कंत्राटदारांनी महाराष्ट्र शासन , सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बीडीजी २०१६/प्र.क्र.२/इमा.२, दि. १२.२.२०१६ नुसार परफॉर्मन्स सिक्युरीटी चा धनाकर्ष मुख्याधिकारी, नगर परिषद वाडी या नावाचा स्कॅन करुन लिफाफा क्र. २ मध्ये सादर लागेल अन्यथा सादर केलेली निविदा रद्द करण्यांत येईल.

३ सदर कामाकरिता वापरण्यांत येणाऱ्या कुशल/अकुशल मनुष्यबळास किमान वेतन अधिनियम १९४८ (Miimum Wages Act 1948) अंतर्गत निश्चित केल्याप्रमाणे किमान वेतन देणे कंत्राटदारास/निविदाधारकांस बंधनकारक राहील.

५ निविदा दरांस मंजुरी मिळाल्यांस आदेश देण्यापूर्वी ४ टक्के रक्कम नगदीने भरावे लागतील व १ टक्का रक्कम निविदे सोबत भरलेली अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून वळती करण्यांत येईल व जेवढे काम केले जाईल तेवढयाच कामाचे रनींग बिल देण्यांत येईल व त्यातून ५ टक्के सुरक्षीत ठेव म्हणून कपात करण्यांत येईल.

६ दिलेल्या मुदतीत काम / पुरवठा पूर्ण करावयास पाहीजे अन्यथा रु. १००/– प्रतिदिवस या प्रमाणे दंड आकारण्यांत येईल किंवा तांत्रिक कारणामुळे मुख्याधिकारी ठरवितील त्या नुसार मुदतवाढीत काम पुर्ण करावे लागेल अन्यथा या नंतर ही काम पूर्ण न केल्यांस कंत्राट रद्द करुन व सुरक्षीत ठेव जप्त करुन पुन्हा निविदा काढून त्यात झालेले नुकसान आपणाकडून वसूल करण्यांत येईल.

७ सदर नमूद काम अंदाजपत्रकच्या स्पेसीफीकेशन प्रमाणेच करावे लागेल अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यांत येवून अशा कार्यवाहीमुळे कंत्राटदाराला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही हानीबद्दल भरपाईची मागणी करता येणार नाही.

८ कामात काही अडथळे आल्यास सबबीवर किंवा इतर कोणत्याही कारणासाठी काम पुर्ण करण्याकरिता मुदतवाढ घेण्याची कंत्राटदाराची इच्छा असल्यास तशा कारणासहित **७** दिवसापूर्वी अर्ज करावा लागेल व त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मुख्याधिकारी कडे राहिल .संबंधित कामाकरिता स्थळनिरीक्षण करून त्याबाबतचे कार्यालयाकडून प्रमाणपत्र घेवून निविदेसोबत सादर करणे आवश्यक नाहे.

९ काम पूर्ण झाल्यावर त्या जागेवर काम करण्यांत आले असेल तेथील शिलकी सामान , कचरा, घाण इत्यादी साफ केल्याशिवाय अंतिम बिल देण्यांत येणार नाही

१० कोणतेही काम सदोश किंवा निकृष्ट प्रतीचे सामुग्री वापरुन केलेले आढळून आल्यास आवश्यक असेल त्या–त्या प्रमाणे केलेले बांधकाम ताबडतोब दुरुस्त करावे / काढून टाकावे लागेल व त्याबद्दल कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.

११ काम पूर्ण झाल्याचे अंतिम प्रमाणपत्र दिल्यानंतर सहा महिण्याच्या आत कामामध्ये कोणत्याही अपुर्णता दिसून आल्यास कंत्राटदार स्वत:च्या खर्चाने त्या दुरुस्त करिल व तसे न केल्यास विभागाकडून दुरुस्त्या करण्यात येईल येणारा खर्च कंत्राटदाराकडून वसूल करण्यांत येईल.

१२ कंत्राटानुसार पार पाडापवयाची सर्व कामे अभियंत्याच्या निर्देशानुसार पार पाडण्यात येतील कार्यालयाकडून संबंधीत अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहिल.

१३ अनामत रक्कम व निविदा किंमतीची रक्कम ऑन लाईन पध्दतीने मुदतीत सादर करावा लागेल अन्यथा निविदा स्विकारण्यांत येणार नाही. स

१४ बांधकामाने बिलातून नियमाप्रमाणे आयकर ,वस्तू व सेवा कर , कामगार उपकर व ईतर शासनाचे कर कपात करण्यांत येईल.

१६ काम सुरु असतांना कोणताही अपघात व हानी झाल्यांस नगरपरिषद जबाबदार राहणार नाही त्याची पुर्णत: जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१७ कामासंबधी काही वाद निर्माण झाल्यांस त्याचा निपटारा करण्यांचे सर्व अधिकार नगर परिषदेला राहील.

१८ हया शर्ती मान्य न करणाऱ्या कोणत्याही कंत्राटदाराला बांधकामाची निविदा देण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

१९ ईतर शर्ती व अटी कार्यालयात चौकशी करुन प्राप्त कराव्यात.

कंत्राटदाराची सही
दिनांक ...............

मुख्याधिकारी
नगर परिषद,वाडी.

नगर परिषद वाडी

Signature Not Verified
Digitally signed by RUCHA GIRISH BHALEKAR
Date: 2026.05.18 18:09:16 IST
Location: Maharashtra-MH